JANABAJI SUMAN BAHUUDEHSIYA SEVABHAVI SANSTHA'S

# Educational Counselling and Assistance Centre

(Reg. Under MSME of Government of India) & (Reg. SWAYAM-NPTEL Local Chapter by IIT Madras)

(P-2579/1, SANT TUKARAMA NAGAR, DEVI ROAD, MANTHA)

## कोणत्याही सभासदाला सभासदत्वाचा लाभ घेण्यासाठी लाभ निहाय पुढील सूचना यांचे माहितीसाठी अवलोकन करावे

| Sr.No. | Benefit for Membership | मार्गदर्शक सूचना |
|---|---|---|
| 1 | ONTSE_1000 to 10000/- | ecac मार्फत दर वर्षी नोहेंबर आणि मे मध्ये हि परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येईल. सभासदाला या साठी अगोदर जाहिराती द्वारे कळविण्यात येईल. (मे साठी मार्च मध्ये, नोहेंबर साठी सप्टेबर मध्ये) साधारण पणे हि परीक्षा रविवारी असेल, या दिवशी जर इतर परीक्षा आल्यास पुढचा रविवार घेण्यात येईल. हि परीक्षा १०० गुणाची , १०० प्रश्न, एक तास केल असेल, प्रश्न मराठी/इंग्रजी मध्ये असतील, या मध्ये पात्रता कट आउट ठरवून दिला जाईल. हि परीक्षा विद्यार्थी स्वतः, किंवा त्याच्या वतीने त्याचे पालक/मित्र/नातेवाईक जी व्यक्ती त्याला योग्य वाटेल ती देऊ शकते. हि परीक्षा इन्टरनेट वापरून मोबाईल/काम्पुटर, या द्वारे देऊ शकता. त्या प्रमाणे यशस्वी विद्यार्थ्याला रु.१०००/- ते १००००/- या दरम्यानचे बक्षीस दिले जाईल. बक्षिसाची रक्कम विद्यार्थ्याच्याच खात्यावर वर्ग केली जाईल )धनादेश/ ऑनलाईन पद्धतीने, रक्कम वर्ग करताना रु. १९९९/- पर्यंतची रक्कम एक रकमी दिली जाईल तर २००० ते १००००/- पर्यंतची रक्कम पुढील प्रमाणे वर्ग करण्यात येईल ( एकूण उर्वरित रकमेच्या ४०%, ३५%, २५% , या प्रमाणात ३० दिवसाच्या अंतराने रकमांचे वितरण करण्यात येईल, या सर्व रकमाचे प्रमाण एकूण पात्र रकमेवर आधारित असतील ) जर विद्यार्थ्याला यात सहभागी व्हायचे असेल तर त्याला ऑप्शन फॉर्म भरून कळविणे बंधनकारक असेल. |

MEMBERSHIP BENEFIT

| | | |
|---|---|---|
| **2** | **Stationary Kit** | विद्यार्थ्याला याचा लाभ घेण्यासाठी दर वर्षी १ मार्च ते ३१ मार्च या दरम्यान ऑप्शन फॉर्म भरून कळवावे लागेल. या साठी इयत्ता १ ली ते ८ या वर्गासाठी शाळेतून कोणत्या प्रकारच्या वह्या अपेक्षित आहेत या बद्दलचे शाळेच्या मुख्याध्यापक यांच्या सही, शिक्क्यानिशी असलेलेल डिटेल ऑप्शन फॉर्म सोबत जोडून ३१ मार्च पर्यंत पाठवावे . तर वर्ग ९ ते पदव्युत्तर पर्यंत विद्यार्थ्याला ecac नियमाप्रमाणे स्टेशनरी कीट वितरीत करण्यात येईल. या मध्ये प्रत्येक लेवलच्या पहिल्या वर्षी विद्यार्थ्याला १ स्कूल बैग मिळेल आणि विहित असलेली स्टेशनरी कीट दरवर्षी मिळेल. |
| **3** | **Uniform Kit (Cloth or Shoo)** | या अंतर्गत १ ली ते १२ या वर्गातील म्हणजेच लेवल १ ते ३ या विद्यार्थ्याला नोंदणी च्या दुसऱ्या वर्षा पासून १ वेळा गणवेश (कपडे) आणि १ वेळा बूट आणि सॉक्स याचा खर्च ECAC कडे मागता येईल. त्या साठी ऑप्शन फॉर्म सोबत कपडे किंवा बूट-सॉक्स यांचे विद्यार्थ्यांच्या नावाचे , दुकानाचे नाव , सही शिक्का असलेले बिल जोडावे , हा फॉर्म आपण खरेदी केल्याच्या २४ तासाच्या आत पाठवावे. ecac नियामाप्रमाणे गणवेश आणि बूट खरेदी एकाच वर्षातील नसावे. |
| **4** | **Dnyan Parv Publication** | या अंतर्गत विद्यार्थी / कुटुंबीय प्रत्येक महिन्याला निघणाऱ्या ज्ञानपर्व मासिकात आपले साहित्य लेख, कथा, कविता , विचार, मराठी/हिंदी/इंग्रजी भाषेतून पाठवू शकता. याचे प्रकाशन ऑनलाईन पद्धतीने प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या दिवशी करण्यात येईल. या साठीची जाहिरात विस्तृत कळविण्यात येईल. |

MEMBERSHIP BENEFIT

| | | |
|---|---|---|
| 5 | **Competitive Exam Reimbursement** | या अंतर्गत लाभ घेण्यासाठी ecacनियमानुसार विद्यार्थ्याला सबंधित परीक्षेचा फॉर्म भरल्यावर ४८ तासाच्या आत ऑप्शन फॉर्म भरून त्या सोबत भरलेला फॉर्म सोबत त्याची शुल्क भरल्याचे डिटेल पाठविणे अनिवार्य असेल. विद्यार्थ्याल्या भरलेला शुल्काचा परतावा त्याने भरलेल्या परीक्षाचे हॉलतिकीट आल्यावर ते ऑप्शन फॉर्मसोबत पाठविल्यानंतरच मिळेल. विद्यार्थ्याला प्रवास खर्च परतावा साठी परीक्षा देऊन आल्यावर ४८ तासाच्या आत ऑप्शन फॉर्म सादर करावा लागेल. विद्यार्थी प्रवास खर्च परतावा आपल्या राहण्याच्या ठिकाणापासून –परीक्षा केंद्र-राहण्याचे ठिकाण या दरम्यान , सरकारी बस- खासगी बस-सिटी बस-रेल्वे (जनरल/स्लीपर/३ टायर ) या सहायाने प्रवास केल्यास त्याची सर्व पुढील पुरावे जोडावे . १) एका कोऱ्या कागदावर तिकिटे चिकटवावी , २) परीक्षा केंद्रावर गेल्यावर ज्या ठिकाणी परीक्षा हॉल चा तपशील लावलेला असतो तेथे विद्यार्थी आणि तो बोर्ड दिसेल असे जिओ टेग फोटो सादर करणे अनिवार्य असेल, ३) तसेच जी परीक्षा आपण दिली त्याची प्रश्न पत्रिका सादर करावी लागेल. या सर्व बाबी ऑप्शन फॉर्म सोबत pdf स्कॅन करून परीक्षा देऊन आल्यावर ४८ तासाच्या आत सादर कराव्या लागतील. या बाबत काही त्रुटी असल्यास विद्यार्थ्याला कळविण्यात येईल. विद्यार्थ्याला त्याने सादर केलेल्या एकूण प्रवास खर्चाची रकमेपैकी ८०% रक्कम २ आठवड्याच्या अंतराने संपूर्ण पडताळणी नंतर त्याच्या बँक खात्यात वर्ग केली जाईल. उर्वरित 20 % रक्कम विद्यार्थ्याने दिलेल्या परीक्षेचा अंतिम निकाल लागल्यानंतर त्याने तत्काळ ऑप्शन फॉर्म भरून त्याने लागलेला निकाल (काहीही असो, पास/फेल) पाठविल्यानंतर १ आठवड्याच्या आत त्याच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात येईल. हा लाभ १ ली १२ वी पर्यंतचा विद्यार्थी एका लेवल मध्ये २ वेळा घेऊ शकतो तर पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थी ३ वेळा घेऊ शकतो. |

MEMBERSHIP BENEFIT

| | | |
|---|---|---|
| 6 | **SWAYAM Exam Reimbursement** | या अंतर्गत कोणताही वर्गातील विद्यार्थी स्वयम चा कोर्स करून तो यशस्वी पूर्ण केला असेल तर त्याला त्याने भरलेली स्वयम ची परीक्षा फी परतावा मिळेल. यासाठी त्याने ecac च्या स्वयम पोर्टल वर नोदंनी करावी किंवा जर तो शिकत आहे त्या महाविद्यालयामध्ये स्वयम केंद्र असेल तिथे नोंदणी करावी<br>१)त्याचे नोदणी डिटेल ऑप्शन फॉर्म सोबत कोर्स नोंदणी केल्यावर पाठवावे<br>२) प्रत्येक आठवड्याच्या विकली टेस्ट चे पुरावे विकली टेस्ट चा उत्तर तालिका डीक्लेर झाल्यावर सेंड कराव्यात<br>३) परीक्षेचा फॉर्म भरल्यावर तो फॉर्म आणि त्याची शुल्क भरल्याची पावती सेंड करावी<br>४) कोर्स चा निकाल लागल्यावर ऑप्शन फॉर्म सोबत उतीर्ण झाल्याचे प्रमाण पत्र पाठवावे .....या नंतर विद्यार्थ्याला १ आठवड्याच्या आत त्याची शुल्क परतावा बँक खात्यावर वर्ग करण्यात येईल. |
| 7 | **Regular Exam Reimbursement** | या अंतर्गत कोणत्याही विद्यार्थ्याला लेवल काळात २ वेळा (एका वर्षात १ वेळ) आपण शिकत असलेल्या नियमित परीक्षेचा शुल्क परतावा मागता येईल त्या साठी विद्यार्थीने आपला परीक्षा फॉर्म आणि त्याचे शुल्क भरून तो महाविद्यालयात जमा करावा त्याची एक कॉपी स्कॅन करून ठेवावी, महाविद्यालायाकडील पावती आणि फॉर्म ऑप्शन फॉर्म सोबत स्कॅन करून ४८ तासाच्या आत ecac कडे पाठवावा ecac कडून पडताळणी नंतर एका आठवड्याच्या आत त्याचा परतावा विद्यर्थ्यांच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात येईल. |

MEMBERSHIP BENEFIT

| | | |
|---|---|---|
| 8 | **Regular Online Prograame** | विद्यार्थी / कुटुंबीय संस्थेचे सर्व नियमित ऑनलाईन कार्यक्रम यात सहभागी होऊ शकता या बाबत वेळोवेळी कळविण्यात येईल. |
| 9 | **H2H Facility Reimbursement** | या विद्यार्थी जर आई-वाडीला पासून दूर, होस्टेल वर , रूम करून, नातेवाईक यांच्या कडे त्याची शाळा असलेल्या ठिकाणी राहत असेल तर त्याला दिवाळी निमित्त तो राहत असलेल्या ठिकाणापासून ते आई-वडील (त्याचे मूळ घर) ते त्याचे राहत असलेले ठिकाण या दरम्यानचा सरकारी बस-खासगी बस-सिटी बस-रेल्वे (जनरल/स्लीपर/३ टायर ) या साधनाच्या सहायाने केलेला खर्चाचा परतावा ecac नियमानुसार देय असेल. त्या साठी संपूर्ण प्रवास पूर्ण केल्यानंतर ४८ तासाच्या आत त्याने ऑप्शन फॉर्म सोबत जाण्या-येण्याची तिकिटे pdf स्कॅन करून पाठवावीत ecac कडून पडताळणी नंतर १ आठवड्याच्या आत त्याचा परतावा विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर करण्यात येईल. |
| 10 | **Research Project Grant** | या अंतर्गत लेवल ४ आणि ५ नुसार पदवी आणि पदव्युत्तर शिकत असलेले विद्यार्थी संशोधन प्रकल्प निधी साठी ऑप्शन फॉर्म आणि प्रस्ताव सादर करू शकतात या मध्ये पुढील प्रमाणे सादर करू शकता<br>१) पदवी प्रथम वर्ष : ग्रूप प्रोजेक्ट<br>२)पदवी दुसर , तिसरे, चोथे वर्ष : वैयक्तिक प्रोजेक्ट<br>३) पदव्युत्तर प्रथम वर्ष : ग्रूप प्रोजेक्ट<br>४) पदव्युत्तर दुसरे वर्ष : वैक्तिक प्रोजेक्ट<br>या अंतर्गत दरवर्षी सप्टेबर १ ते ३० या दरम्यान या बाबत जाहिरात काढण्यात येईल .<br>१ ते १५ ऑक्टोबर या दरम्यान प्रोजेक्ट सिलेक्शन मुलाखती / स्कृटनी होतील<br>१६ ऑक्टोबर ते २६ ऑक्टोबर या दरम्यान प्रकल्प मंजुरी तसेच सबंधीताकडून आवश्यक कागदपत्राची पूर्तता |

MEMBERSHIP BENEFIT

| | | |
|---|---|---|
| | | करण्यात येईल .<br>१० नोव्हेंबर पर्यंत ४०% रकमेचे वितरण करण्यात येईल<br>३० दिवसाचा प्रथम कामकाज प्रगती आहवाल १५ डिसेंबर सादर करावा लागेल<br>२० डिसेंबर पर्यंत उर्वरित रकमेच्या ५०% रकमेचे वितरण करण्यात येईल<br>६० दिवसाचा द्वितीय कामकाज प्रगती आहवाल १५ जानेवारी पर्यंत सादर करावा लागेल.<br>२० जानेवारी पर्यंत उर्वरित रकमेच्या ५०% रकमेचे वितरण करण्यात येईल<br>९० दिवसाचा तृतीय कामकाज अहवाल आणि अंतरिम प्रकल्प रिपोर्ट सादरीकरन १५ मार्च पर्यंत सादर करावा लागेल<br>१५ एप्रिल पर्यंत ३ प्रकल्प अहवाल स्मार्ट बायडिंग करून त्या पैकी एक बायडिंग प्रमाणे अंतिम प्रकल्प अहवाल आणि प्रोजेक्ट सबमिशन पत्रासोबत स्कॅन करून पाठविणे अनिवार्य असेल, या नंतर ecac कडून पडताळणी होईल आणि उर्विरीत रकमेचा धनादेश महाविद्यालयात येऊन कार्यक्रमात सदरील विद्यार्थ्याला प्रदान करण्यात येईल या वेळ एक हार्ड कॉपी + अंतिम प्रकल्प अहवाल आणि प्रोजेक्ट सबमिशन पत्रासोबत ecac कडे हस्तांतरित करणे अनिवार्य असेल. |
| **11** | **Internal Assessment Reimbursement** | या अंतर्गत विद्यार्थी आपल्या नियमित अंतर्गत मुल्यामापणासाठी लागणाऱ्या , प्रक्टिकल बुक, प्रोजेक्ट पेपर , कार्ड शीट या साठी लागणाऱ्या खर्चासाठी ecac कडे परतावा मागू शकतो. या साठी प्रक्टिकल बुक खरेदी केल्यावर त्याचे बिल ऑप्शन फॉर्म सोबत ४८ तासाच्या आत पाठविणे अनिवार्य असेल. एका आठवड्याच्या आत त्याचा परतावा वितरीत करण्यात येईल. |

MEMBERSHIP BENEFIT

| | | |
|---|---|---|
| **12** | **On Jab Training (OJT) Facility** | या अंतर्गत पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांना ecac अंतर्गत विविध कामाकाजासाठी ऑन जॉब ट्रेनिंग टार्गेट बेस्ड वर्क या साठी करता येईल , या दरम्यान विद्यार्थ्याला उचित मानधन देण्यात येईल. याची जाहिरात निघणार नाहीत . विद्यार्थी दर वर्षी या साठी ऑप्शन फॉर्म भरून कळवू शकतो. त्याला ज्या वर्षी ojt प्रमाणपत्र आणि इतर डिटेल हवी असेल त्या वर्षी तो देण्यात येईल. |
| **13** | **Innovation Festival** | या अंतर्गत प्रत्येक वर्षी इनोवेशन फेस्टिवल ची जाहिरात काढण्यात येईल या मध्ये शालेय स्तर, तालुका स्तर, जिल्हा स्तर, विभाग स्तर, राज्य स्तर या प्रकारात आयोजन असेल याची सुरवात नोहेंबर मध्ये होऊन याची सांगता मार्च मध्ये होईल. प्रत्येक लेवल मधून ४ पारितोषिके काढण्यात येतील या मध्ये विषयाची लिमिट नसेल . प्रकल्प नाविण्यपूर्ण आणि सामाजिक हिताला , वैज्ञानिक दृषीकोन असणाऱ्या निकषात बसणारा असावा. राज्य स्तरीय स्पर्धा ecac निश्चित करेल त्या ठिकाणी असेल. तर तालुका स्तर, जिल्हा स्तर-विभागस्तर या साठी सबंधित शाळा/कॉलेज अर्ज करू शकतात त्यांना उचित नियोजन खर्च ecac नियोजना प्रमाणे देण्यात येईल. |
| **14** | **Conference / Workshop / Lecture series** | या अंतर्गत कोणत्याही लेवल साठी संशोधन निबंध ecac कडून विद्यार्थ्यांसाठी आयोजित सेमिनार, कॉन्फरन्स , वर्कशोप , व्याख्यानमाला या मध्ये सहभागी होऊ शकता , या अंतर्गत साबंधीताचे शोध निबंध isbn क्रमांक असलेल्या पुस्तिकेमध्ये प्रकाशित करण्यात येईल.दरवर्षी नोहेंबर मध्ये याची जाहिरात प्रसारित करण्यात येईल. |
| **15** | **Online Courses (Mooc's)** | या अंतर्गत कोणत्याही लेवल साठी शिकणारा विद्यार्थी ecac कडून चालविण्यात येणारे ऑनलाईन कोर्सेस करू शकतात. या साठीची जाहिरात जुलाई महिन्यात प्रसारित होईल. |

MEMBERSHIP BENEFIT

| | | |
|---|---|---|
| 16 | **ISBN Publication** | या अंतर्गत पदवी आणि पदवी स्तरावरील शिकणाऱ्या विद्यार्थ्याला आपले शोध निबंध isbn प्रकाशन पुस्तिकेत ऑनलाईन प्रकाशन करण्याची संधी असेल. याची जाहिरात एप्रिल-मे या महिन्यात प्रसारित होईल. |
| 17 | **Annual Award (11)** | ECAC कडून दर वर्षी सभासद विद्यार्थ्यांच्या प्रगती साठी एकूण ११ प्रकारचे पारितोषिके देण्यात येतील. पारितोषिकाचे वितरण या बाबत त्या त्या वेळी कळविले जाईल |
| 18 | **ECAC Centre Monitoring Facility** | या अंतर्गत ज्या विद्यार्थ्यांचे पालक किंवा विद्यार्थी आपल्या गावात ECAC चे केंद्र चालविण्यासाठी इच्छुक असतील त्यांना ECAC नियमाप्रमाणे हे कार्य करता येईल या साठी फिक्स मानधन तसेच प्रोग्रेसिव इनसेनटीव मिळेल. या बाबत आपण ecac कडे ऑप्शन फॉर्म पाठवून प्रत्यक्षात संपर्क करावा. |

MEMBERSHIP BENEFIT